# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०११/
दिनांक : 17 FEB 2011

प्रति,
संचालक,
पुणे जिल्हा शिक्षण असोसिएशनचे इन्स्टिटयूट ऑफ
टेक्निकल एज्यकेशन, रिसर्च अँड मॅनेजमेंट,
सेक्टर नं.२८, पीसीएनटीडीए,
आकुर्डी, पुणे – ४११ ०४४.

**(Institute Code:-6608)**
**Application No.: 1-6983761**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.वेस्ट/१-६९८३७६१/२०१०/न्यु. दि.१३.०७.२०१०.
२. शासन निर्णय क्र.टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४, दि. ३० जून २०१०.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर एम.बी.ए. या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एमबीए | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून एमबीए ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सन २०१०-११ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.
४. संस्थेने एमबीए ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून **रु. ७.०० लाख बँक ऑफ महाराष्ट्र,** शाखा पुणे आकुर्डी येथे खाते क्र.११८७११, दि.८.११.२०१० अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु. ६.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व शिक्षण शुल्क समिती, मुंबई, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई, महाराष्ट्र शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. आपल्या संस्थेची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती बांद्रा यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व कुलसचिव, **पुणे विद्यापीठ, पुणे** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन किंवा **पुणे विद्यापीठ, पुणे** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा कुलसचिव, **पुणे विद्यापीठ, पुणे** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला कुलसचिव, **पुणे विद्यापीठ, पुणे** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१३. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१४. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही. तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१५. शासनाने, या संचालनालयाने व कुलसचिव, **पुणे विद्यापीठ, पुणे** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

१६. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(डॉ.सु.का महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी, सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. श्री.एन.बी.पाटील, सिस्टिम अॅनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.